# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.महिला व बालकल्याण समिती
## कार्यपत्रिका क्रमांक-६
## सभावृत्तांत

दिनांक- ९/१२/२००९ वेळ- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ९/१२/२००९ रोजी दुपारी २.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.लोखंडे सुजाता सुनिल - सभापती
२. मा.सौ.गावडे सुषमा गोविंद
३. मा.भारती ज्योती सुखलाल
४. मा.उबाळे वैशाली संजय
५. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
६. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
७. मा.फुगे सुनंदाताई विजय
८. मा.आशा अंकुश लांडगे

याशिवाय मा.चाकणकर- उपनगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले-

विषय क्रमांक- २) महानगरपालिकेच्या बालवाडयांमधील मुलांना मोफत आहार व खेळणी देणेबाबत..मा.ज्योती भारती,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ३) सांगवी येथे प्रदर्शन व विक्रीसाठी बहुउद्देशीय माहिला केंद्र बांधणेकामी अंदाजपत्रकात तरतुद करणेबाबत ..मा.ज्योती भारती, मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ४) वॉर्ड क्र.१०० कासारवाडी येथील उद्यानामध्ये खेळणी बसविणेबाबत- मा.सुषमा गावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव...

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा. ज्योती भारती    अनुमोदक : मा.चंद्रकांता सोनकांबळे

शुक्रवार दिनांक १८/१२/२००९ रोजी दुपारी १२.०० पर्यंत सभा तहकुब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

------------

मा.सभापती- शुक्रवार दि.१८/१२/२००९ रोजी दुपारी १२:०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

------------

(सुजाता सुनिल लोखंडे)
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. महिला व बालकल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक-६
सभावृत्तांत
(दिनांक ९/१२/२००९ ची तहकुब सभा)

दिनांक- १८/१२/२००९ वेळ- दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बाल कल्याण समितीची दिनांक ९/.१२/२००९ ची तहकुब सभा शुक्रवार दिनांक १८/१२/२००९ रोजी दुपारी १२.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.लोखंडे सुजाता सुनिल - सभापती
२. मा.सौ.गावडे सुषमा गोविंद
३. मा.भारती ज्योती सुखलाल
४. मा.धराडे शकुंतला भाउसाहेब
५. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
६. मा.फुगे सुनंदाताई विजय

याशिवाय मा.चाकणकर-उपनगरसचिव मा.जगताप - समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक : मा. ज्योती भारती अनुमोदक : मा.चंद्रकांता सोनकांबळे

सन्मा.नगरसेवक भाउसाहेब भाईर यांच्या पत्नी सौ.मनिषा भोईर यांचे दु:खद निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

------------

( उपस्थितांनी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण केली.)

------------

दिनांक ११/११/२००९,१६/११/२००९ व १९/११/२००९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक- १२ विषय क्रमांक- १
दिनांक- १८/१२/२००९ विभाग- नागरवस्ती विकास योजना
सूचक- मा.शकुंतला धराडे अनुमोदक- मा.सुषमा गावडे
संदर्भ- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नावियो/६/कावि/१६७७/०९ दि.२६/१०/०९
विषय- मे.मॅक्स टेलीकॉम एज्युकेशन सोसायटी (एम.टेल) पुणे या संस्थे मार्फत प्रशिक्षण देणेबाबत...

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-

ठराव क्रमांक- १३ विषय क्रमांक- २
दिनांक- १८/१२/२००९
सूचक- मा. ज्योती भारती अनुमोदक- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ- मा.ज्योती भारती,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

महानगरपालिकेच्या शाळेतील इ.१ ते ७ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांना महानगरपालिकेमार्फत सकस आहार देण्यात येतो. परंतु मनपाच्या बालवाडयांमधील मुलांना सकस आहार दिला जात नाही. तरी महानगरपालिकेच्या बालवाडयांमधील मुलांना महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत राबविण्यात येणा-या महिला बाल कल्याण योजनेअंतर्गत मोफत सकस आहार व खेळणी देण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------------

ठराव क्रमांक- १४ विषय क्रमांक- ३
दिनांक- १८/१२/२००९
सूचक- मा. ज्योती भारती अनुमोदक- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ- मा.ज्योती भारती,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

पिं.चिं.मनपा च्या महिला व बालकल्याण योजना अंतर्गत एकुण तरतुद र.रु.२०,४८,४५,०००/- सन २००९ - १० च्या मुख्य १) अंदाजपत्रकामध्ये करण्यात आलेली आहे. महिला व बालकल्याण उपक्रमात २) बहुउद्देशीय महिला केंद्र या कामाअंतर्गत सांगवी वॉर्ड क्र.९२ मधील स.नं.९ येथील भाजी मंडईच्या शेजारी मनपाच्या जागेवर महिला बचत गटाच्या उत्पादीत वस्तुंचे प्रदर्शन व विक्रीसाठी बहुउद्देशीय महिला केंद्र बांधणे आवश्यक आहे, त्यासाठी सन २००९ - १० च्या सुधारीत व सन २०१० - ११ च्या मुळ अंदाजपत्रकामध्ये वॉर्ड क्र.९२ सांगवी मधील स.नं.९ येथील मनपाच्या जागेत बहुउद्देशीय महिला केंद्र बांधणेसाठी र.रु.२ कोटी ची तरतुद करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

ठराव क्रमांक- १५ विषय क्रमांक- ४
दिनांक- १८/१२/२००९
सूचक- मा. सुषमा गावडे अनुमोदक- मा.शकुंतला धराडे
संदर्भ- मा.सुषमा गावडे,मा.शकुंतला धराडे यांचा प्रस्ताव..

वॉर्ड क्र.१०० कासारवाडी मध्ये उद्यानामध्ये लहान मुलांसाठी वेगवेगळी चांगल्या प्रकाराची खेळणी बसविणेकामी र.रु.५०,००,०००/- खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(सुजाता सुनिल लोखंडे)
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय,
क्रमांक- नस/९/कावि/१४४१/०९
दिनांक- २२/१२/२००९

सही/-
उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.